
# उंदीर मेला आणि, मुंगी दुःखी आहे

प्यूब्लो इंडियन कहानी



मराठी : अश्विनी बर्वे



उंदराच्या केसात एक गाठ पडली आहे.

त्याने केस थोडे ओढले पण गाठ सुटली नाही.





“मुंगी मला मदत करेल” त्याने विचार केला आणि मुंगीला शोधायला तो निघाला.



मुंगी स्वयंपाकघरातून मक्याचे
दाणे उचलत होती.

“माझ्या केसात गाठ आहे,” उंदीर म्हणाला.
“बघू मागे वळ बरं मी गाठ सोडून देते,”
मुंगी म्हणाली.





“यात काय आहे? उंदराने विचारले
पण मुंगी आपल्या कामात व्यग्र
होती, तिने काहीच उत्तर दिले नाही.


मडक्यात आत काय आहे हे
बघण्यासाठी त्याने आत डोकावले.





“उंदरा, तुला माझ्या मदतीची गरज आहे का?” मुंगीने विचारले. “उंदरा, तू अजून जिवंत आहेस का?”

"गाठ सुटली,” मुंगी म्हणाली आणि तिने उंदराची शेपटी सोडून दिली. उंदीर धपकन मडक्यात पडला.



पण उंदीर कामात मग्न होता.त्याने काहीच उत्तर दिले नाही. मुंगी इकडे तिकडे पळाली आणि मग ती रडायला लागली.






“तू का रडतेस?"
निळकंठने विचारले.

"उंदीर मेला आणि मी दुःखी आहे,”
"हेच माझ्या रडण्याचे कारण आहे.."
"हे ऐकून मी सुद्धा दुःखी झालो आहे,"
नीलकंठ म्हणाला.



"माझे पंख झाडून टाकतो,"
नीलकंठ म्हणाला.






फिर उसने कपास के पेड़ में मग त्याने आपले पिसं झाडले,” तुझे पिसं कुठे आहेत?” कपाशीच्या झाडाने विचारले. “उंदीर मेला आणि मुंगी दुःखी आहे आणि म्हणून मी ही माझी पिसं काढून टाकले,” नीलकंठ म्हणाला.



"जर उंदीर मेला आणि मुंगी दुःखी आहे आणि तुला पंखच नाही तर मी सुद्धा कोमेजून छोटे होतो," झाड म्हणाले. आणि त्याने तेच केले.





तेवढ्यात एक मेंढा कपाशीच्या झाडाजवळ आले, तो उन्हापासून वाचण्यासाठी तिथे आला होता, पण झाड त्याला सावली देवू शकत नव्हते. “झाडा तू एवढा कसे कोमेजले?” मेंढ्याने झाडाला विचारले.





उंदीर मेला आहे आणि मुंगी दुःखी आहे आणि नीलकंठने आपली पिसं झाडून टाकली, म्हणून झाड कोमेजून गेले असे कपाशीच्या झाडाने सांगितले.






“जर उंदीर मेला आहे आणि मुंगी दुःखी आहे, नीलकंठा जवळ पंख नाही आणि तुही कोमेजलं आहेस तर मी ही बारीक होते,” असे मेढी म्हणाली.

मग मेंढी नदीवर पाणी प्यायला गेली तेव्हा नदीने मेंढीला विचारले, “तू एवढी बारीक का झालीस?”

मेंढी म्हणाली, “उंदीर मेला, आणि मुंगी दुःखी आहे आणि निलकंठाने पंख झाडले, कपाशीचे झाड कोमेजले आणि म्हणून मी बारीक झाले.”



नदी म्हणाली “असे असेल तर
मी पण वाळून जाते.”
आणि नदीने तसेच केले.
मग एक मुलगी नदीवर पाणी
प्यायला आली..

“उंदीर मेला, मुंगी दुःखी आहे,
निळकंठाकडे पंख नाहीत, कपाशीचे
झाड कोमेजले, मेंढी बारीक झाली
आणि म्हणून मी वाळले,” नदी
म्हणाली.



“मग मी ही मडके फोडते,”
मुलगी म्हणाली आणि तिने तसेच केले.



मुलीच्या आईने मुलीला विचारले,
“पाणी कुठे आहे?”
मुलीने सांगितले, उंदीर मेला, मुंगी दुःखी आहे, नीलकंठाकडे पंख नाहीत, कपाशीचे झाड कोमेजले आणि मेंढी बारीक झाली आणि नदी वाळली म्हणून मी पण माझे मडके फोडून टाकले.”





“मग मी पण माझ्या कानातले जाळून टाकते,” आणि तिने तसेच केले.





आईच्या भावाने विचारले, ”तू असे आपले कानातले का जाळते आहे?”

“उंदीर मेला आणि प्रत्येकजण दुःखी आहे “मुलीच्या आईने सांगितले. ”आणि म्हणूनच मी माझे कानातले जाळून टाकते आहे.”

“मग माझ्या घोड्याची शेपूट कापून टाकतो,” तो माणूस म्हणाला.



पण घोड्याने आपली
शेपटी कापण्यापासून
माणसाला थांबवले.

घोडा म्हणाला, “माझी शेपटी लांब आहे
आणि मला ती प्रिय आहे आणि
तिच्यामुळे मला माशा हाकलता येतात.
तुम्ही तिला का कापू इच्छिता?”



“उंदीर मेला आणि मी दुःखी आहे,”माणूस म्हणाला. “असे आहे तर तुम्ही माझी शेपूट जरूर कापा,”घोडा म्हणाला, पण तुम्ही मेलेल्या उंदराला पाहिले आहे का?” “नाही “माणूस म्हणाला, “माझ्या बहिण तिचे कानातले जाळतांना मी पाहिले बस”





“तुम्ही मेलेल्या उंदराला पाहिले आहे का?”घोड्याने विचारले. “नाही” ती महिला म्हणाली. “पण माझ्या मुलीने वाळलेली नदी पाहिली.”

घोडा नदीव आला, त्याने विचारले, “तू मेलेला उंदीर पाहिलास का?” तर नदी म्हणाली, “नाही,मी मेंढीला पाहिले आणि ती एकदम बारीक झालेली होती.”






“काय तू मेलेला उंदीर पाहिलास का ?” घोड्याने मेंढीला विचारले. तर मेंढी म्हणाली, “नाही, मी कपाशीचे झाड पाहिले. आता ते सावली देत नाही.”

घोडा झाडाजवळ गेला आणि त्याने विचारले, “तू मेलेला उंदीर पाहिला का?”तर झाड म्हणाले, “नाही”

“मी निळकंठाला पंख झडतांना पाहिले.”



मी दुःखी झालो आणि मी माझे पंख झाडून टाकले”नीलकंठ म्हणाला. “मग तर तू मेलेला उंदीर नक्की पाहिला असेल,” घोडा म्हणाला. “नाही” नीलकंठ म्हणाला, “मी तर फक्त मुंगीला रडतांना पाहिले.”





मग घोडा, मुंगीच्या शोधात निघाला.

घोड्याने मडक्यात डोकावून पाहिले, “त्या मूर्ख मुंगीने मडक्यात पाहिले नाही, आणि त्यामुळे माझी सुंदर शेपटी कापली गेली असती.”घोडा म्हणाला.







मग घोडा फिरला आणि त्याने त्याची शेपटी मडक्यात टाकली.




उंदीर शेपटी पकडून मडक्यातून बाहेर आला.






“उंदरा तू अजून जिवंत आहेस.” मुंगी ओरडली. मग मुंगी इकडे तिकडे धावायला लागली आणि ती मक्याचे दाणे उचलायला लागली. “उंदीर परत आला,” असे म्हणत ती आनंदाने ओरडली. “या आनंदात आपण एक नाच आयोजित करायला पाहिजे.”

घोड्याच्या आवडत्या मोठ्या शेपटीत गाठी होत्या. पण मुंगीने उंदराच्या मदतीने त्या काढल्या.




नदी आता पहिल्या सारखी वाहू लागली आणि मेंढी जाड झाली आणि कपाशीचे झाड घनदाट सावली देवू लागले.





त्या महिलेने नवीन मडके तयार केले आणि तिच्या भावाने तिला निळ्या रंगाचे लोंबते कानातले दिले.







पण नीलकंठाला बराच काळ
झाडावर बसून राहावे लागले, तेव्हा
त्याला त्याचे पंख परत मिळाले.

समाप्त